# मराठी वाङ्मयेतिहासाच्या अध्यापनाची उद्दिष्टये आणि पद्धती

**प्रा. डॉ. गणपती जोतीबा मोरे**
मराठी विभाग प्रमुख,
स्व. नितीन महाविद्यालय, पाथरी
ganpatimore69@gmail.com

साधारणतः महाराष्ट्रातील विद्यापीठांमध्ये पदवी आणि पदव्युत्तर स्तरांवर मराठी वाङ्मयाचा इतिहास या अभ्यासपत्रिकेचे अध्ययन आणि अध्यापन केले जाते. पदवी स्तरावर मराठी वाङ्मयाच्या म्हणजे प्राचीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचे आणि पदव्युत्तर स्तरावर आधुनिक मराठी वाङ्मयाच्या इतिहास अभ्यासपत्रिकेत अभ्यासक्रमाला ठेवली जाते. पदवी स्तरांवरील विद्यार्थ्यांचा अवती-भोवतीच्या काळाचे आणि घटनांचा अन्वयार्थ लावण्यासाठी ज्या विवेचक बुध्दीचा विकास व्हावा लागतो तो तितकासा झालेला नसतो. आणि (दृष्टीकोण) विकसित म्हणून पदवी स्तरावर आणि पदव्यूत्तर स्तरांवर आधुनिक मराठी वाङ्मयाचा प्राचीन इतिहास ही अभ्यासपत्रिका अभ्यासक्रमास ठेवली जात असावी. इतिहासामध्ये भूतकालीन घटनांचा झालेल्या बदलांचा घडून आलेल्या परिवर्तनाचा आणि भिन्न-भिन्न विचार प्रवाहांचा वर्तमान संदर्भात लावलेला अन्वयार्थ म्हणजे इतिहास अशी इतिहासाची स्थूलमानाने व्याख्या करता येईल. तेव्हा मराठी वाङ्याचा इतिहास म्हणजे मराठी वाङ्मयाच्या प्रारंभापासून तो आतापर्यंत त्यात जी संक्रमने झाली, परिवर्तने घडली, जे भिन्न-भिन्न प्रवाह निर्माण झाले, ज्या वाङ्मयप्रकारांचा विकास आणि विस्तार किंवा प्रसार झाला त्याचे अवलोकन मराठी वाङ्मयाच्या इतिहासात केले जाते. मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचे अवलोकन करत असतांना स्थळ, काळाचे संदर्भ लक्षात घ्यावे लागतात.

मराठी वाङ्मयाचा इतिहास हा वाङ्मयक्षेत्रातील अत्युच्च कामगिरी केलेल्या व्यक्तिला प्राधान्य देवून किंवा कथा, कविता, कादंबरी, नाटक या वाङ्मयप्रकारांना प्राधान्य देवून त्यांच्या नावाने समालोचनात्मक आढावा घेवून वाङ्मयाचे इतिहास लेखन झालेले दिसून येते. मराठी वाङ्मयाच्या इतिहासामध्ये लेखन झालेले दिसून येते. मराठी वाङ्मयाच्या इतिहासामध्ये 'वैचारिक प्रवृत्तीचे विवेचन' करावे लागते. म्हणजे स्थळ-

काळाच्या संदर्भात धर्म कला ललित, ललित साहित्य सामाजिक, राजकीय घडामोठी, मानवी प्रवृत्ती त्यांचे संघर्ष, तत्त्व, जीवनमूल्ये विकार विचार यात जो आशय अभिव्यक्त होतो त्याचे चिकित्सक विश्लेषण करावे ही अपेक्षा वाङ्मय इतिहासामध्ये अपेक्षित असते. तेव्हा व्यक्तिला प्राधान्य देवून वाङ्मय प्रकारांचे संकीर्ण आढावा घेण्यापेक्षा संत वाङ्मयचा इतिहास पंथ वाङ्मयाचा इतिहास असे वाङ्मयीन प्रवृत्तींना प्राधान्य देवून मराठी वाङ्मयाचे इतिहास लेखन आणि अध्ययन अध्यापन झाले पाहिजे. त्यामुळे मराठी वाङ्मयाला पोषक ठरणारी संस्कृती, विचार प्रवाह, मानवी प्रवृत्तीचे त्यात प्रतिबिंब पडेल. त्याशिवाय वाङ्मय आणि जीवन यांचा अनुबंध जोडला जाणार नाही. म्हणून मराठी वाङ्मयाच्या इतिहास लेखकांनी आणि अध्यापकांनी हा दृष्टीकोण समोर ठेवून मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचे लेखन अध्ययन आणि अध्यापन व्हावे अशी रास्त अपेक्षा ठेवण्यास काही हरकत नसावी.

कधी-कधी एखाद्या कालखंडामध्ये मधूनच महान अशी कलाकृती किंवा प्रतिभा आविर्भूत होते की, तिच्यामुळे त्या विशिष्ट कलावंताचे व्यक्तिमत्व आणि कर्तृत्व त्या काळात उठून दिसते. उदा. यादव काळामध्ये ज्ञानेश्वरासारखे व्यक्तिमत्व शिवकाळामध्ये संत तुकारामासारखे व्यक्तिमत्व किंवा आधुनिक काळाचे उदाहरण घ्यायचे तर कवी केशवसूत आणि बा.सी.मर्ढेकर यांचे घेता येईल. या कलावंताच्या प्रतिभेची झेप उत्तुंग अशी होती. त्यांच्या व्यक्तिमत्वाने आणि कर्तृत्वामुळे मराठी वाङ्मय सर्वश्रेष्ठ अशा पदवीला पोहचविले. अशा व्यक्तिमत्वाच्या किंवा त्यांच्या कर्तृत्वाचे योग्य मूल्यमापन झालेच पाहिजे परंतु त्यांच्या सहवासात किंवा त्यांचे समकालीन जे लहान-लहान लेखक कलावंत असतांत त्यांच्याकडे ही योग्य लक्ष देले पाहिजे. कारण लहान लहान ओघळ मिळूनच नदी होत असते. या सर्वांचाच हातभार मराठी वाङ्मयाच्या विकासात लागलेला असतो. तेव्हा या सर्व बाबींकडे लक्ष पुरवले. व्यक्तिप्राधान्यतेबरोबरच तत्वप्रधानता ही उद्दिष्टे समोर ठेवून वाङ्मय इतिहासाचे अध्यापन होणे आवश्यक आहे.

वाङ्मय इतिहासाच्या अध्यापनाची उद्दिष्टये अनेक आहेत. वाङ्मयीन ग्रंथाची विषय आणि स्वरूप या दृष्टिने कालक्रमानुसार सत्य आणि साधार माहिती विद्यार्थ्यांना अध्यापकांनी वर्गामध्ये देणे हे तर अपेक्षितच असते. तद्वत वाङ्मय निर्मात्या व्यक्तित्वाची आणि त्याच्या चरित्राची माहिती वाङ्मय अध्यापकास असावी लागतेच पण एवढयाचे मुळीच भागत नाही. वाङ्मयात घडून आलेली संकलणे त्याचे चिकित्सकपणे केलेले

विवेचन आदि यथार्थ मूल्यांकन अध्यापकाने केले पाहिजे या वाङ्मयनिर्मिती मागे सामाजिक परिस्थिती कशी कारणीभूत आहे. तसेच वैयक्तिक प्रेरणा कोणत्या आहेत जेणे करून ही वाङ्मय निर्मिती होण्यास मदत झाली. याचे अचूक निदान वाङ्मयाच्या अध्यापकाने करावयास हवे.

प्रत्येक युग गतकाळाचा इतिहास लिहीते. किंवा लिहीलेला नव्याने लिहीते. ते वर्तमानाच्या संदर्भातच मराठी वाङ्मयाच्या इतिहासाच्या अध्यापनाच्या दृष्टिने मराठी वाङ्मयाच्या परंपरा आणि लेखन प्रवृत्ती यांचेही विवेचन मराठी वाङ्मयाच्या इतिहासामध्ये अभिप्रेत असते. वाङ्मयामध्ये घडून आलेले बदल लेखनाच्या प्रवृत्ती अचानक होत नसतात. त्याचे धागे भूतकाळाशी जोडलेले असतात. तेव्हा अध्यापकाने भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांच्या अनुबंध जोडणे असता अध्यापनामध्ये अपेक्षित असते. कारण कोणत्याही जीवंत समाजाचा वर्तमानकाळ हा त्यांच्या इतिहासाच असतो. हा ऋणानुबंध समाजाच्या प्रत्येक कृतीत, गतीत, स्थितीत गर्भित असतो. अध्यापकाने सोप्या कौशल्याने हया ऋणानुबंधची उकल अध्यापनामध्ये केलेली असावी.

वाङ्मय इतिहासामध्ये त्या-त्या काळातील वाङ्मयकृतीचे आणि कलावंताच्या लेखन कर्तृत्वाचे मूल्यांकन करून त्याचे वाङ्मय इतिहासातील स्थान निश्चित करावे लागते. हे मूल्याकंन आधुनिक मूल्यांनी करावे की त्या त्या काळच्या दृष्टिकोन आणि मूल्यांनी करणे या विचारांमध्ये वाद होण्याची दाट शक्यता आहे. प्राचीन वाङ्मयाचे अर्वाचिन वाङ्मयमूल्यांनी काही प्रमाणात मूल्यांकन करता येईल असे मला वाटते. धर्मतत्वे लोकांना परिक्षण करत असतात. कारण कोणत्याही वाङ्मयाचे मूल्यांकन करतांना ती ती परिस्थिती लक्षात घ्यावी लागते. कारण आधुनिक परिस्थिती आणि मूल्यांनी त्या कलाकृतीचे आणि कलावंताचे मूल्याकंन करायचे म्हटले तर त्यावरती अन्याय होण्याची शक्यता असते. दुसरे मत असे की, आपण भूतकालीन घटनांकडे कशाकरीता वळत असतो. तर वर्तमानकाळातील परिस्थिती समस्या समजून घेण्यास कारण वर्तमान संदर्भातच आपणास इंटरेस्ट असतो म्हणून वर्तमान समस्येची उकल होण्यासाठी आपण भूतकाळात डोकावत असतो.

कोणत्याही कलावंताच्या व्यक्तिमत्वाचे मुल्यांकन वाङ्मयाच्या शाश्वत अशा मूल्यांची करावयास हवे. याचाच अर्थ असा की सामाजिक आणि वाङ्मयीन मूल्यांनी त्याच्या व्यक्तीमत्वाचे मूल्यांकन अध्यापकांनी करावयास हवे. वाङ्मयामयीन विचारांचे,

संस्कृतीचे प्रतिबिंब आणि त्याचे वहन झालेले असते. तेव्हा वाङ्मय इतिहासाच्या अध्यापकाने त्या वाङ्मयातील ध्येय प्रवर्तनेचा किंवा जीवनदृष्टिचा शोध घेणे महत्वाचे ठरते. प्राचीन काळी समाजातील सर्व व्यवहारावर धर्माची पकड होती. हाच दृष्टीकोन वाङ्मयाचे निर्मिती करतांना मुख्य होता. तर आधुनिक कालखंडातील वाङ्मयातून भौतीक दृष्टीकोनाची छाप वाङ्मयकृतीवर पडलेली दिसून येते. तेव्हा लेखक कलावंताची जीवनाकडे पहाण्याची दृष्टी समजून येणे महत्वाचे ठरते.

**समारोप :-**

वाङ्मय इतिहासाचे अध्ययन आणि अध्यापनामध्ये मतभेद होण्याची दाट शक्यता असते. कारण वाङ्मय इतिहास हा सामाजिक घडामोंडीचा इतिहास असता सामाजिक शास्त्रत भौतीक अचुकता अपेक्षित नसते. जास्त सत्याच्या जवळ जाण्याचा हा प्रयास असतो. असे जरी असले वाङ्मय इतिहास म्हणजे अभ्यासाच्या पद्धती बरोबरच अनेक दृष्टीकोनातून मूल्यमापन असते. हे कायम लक्षात ठेवणे आवश्यक असते. या दृष्टीने वाङ्मय इतिहासाचे अध्यापन होणे आवश्यक आहे.

**संदर्भ :-**

१) प्रतिष्ठान डिसेंबर १९७५, राजेंद्र बीडकर, मराठी वाङ्मयेतिहासाच्या अध्यापनाची उद्दिष्टये आणि पध्दती पृ. १२.
२) देशपांडे अ. ना. आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, व्हिनस प्रकाशन, पुणे.
३) शेवडे इंदूमती, मराठी कथा उद्‌गम आणि विकास, सोमय पब्लिकेशन प्रा. लि. मुंबई १९२३ पृ. ६१.